# क्वान्टम हाय टेकने सीसीटीव्ही एचडी अपग्रेड्सकरिता २एमपीपर्यंतच्या एएचडी उपाययोजना दाखल केल्या

मुंबई -कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि उच्च दर्जाची आयटी पेरिफेरल्स यांच्यामधील भारतातील आघाडीची कंपनी असलेल्या क्यूएचएमपीएलने क्वान्टम हाय टेक या ब्रँड नावाखाली परवडण्यायग्य किंमतीमध्ये उच्च दर्जाची उत्पादने देऊ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार करत एएचडी डोम आणि बुलेट स्टाईल कॅमेरासह उत्कृष्ट दर्जाचे व हाय डेफिनेशन व्हिडीयो आणि 1920*1080 पिक्सेलपर्यंत रेझोल्युशन देऊ करणारी 11 मॉडेल्स दाखल केली आहेत.




सुरक्षा आणि सर्व्हेलन्स यांच्या वाढत्या गरजा पूर्ण करणाठ्या डोम कॅमेऱ्यामध्ये आयआर-कट फिल्टरसह डे/नाईट सर्व्हेलन्सची सुविधा देऊ करण्यात आली आहे. यांतील 36 बिल्ट-इन आयआर एलईडी 30 मीटर्सपर्यंतची आयआर रेंज आणि दिवस असो वा रात्र, उत्कृष्ट दर्जाच्या इमेज देऊ करतात. बुलेट कॅमेरा 50 मीटर्सची रेंज देत असून त्यांमध्ये 72 आयआर एलईडी असतात. हे कॅमेरा कावोख्या वातावरणामध्ये आपोआप ब्लॉक/व्हाईट मोडला जातात. किमान इल्युमिनेशनची आणि 12 व्हीडीसीची जोड मिवाल्याने वापरकर्त्यांना कावोख्या पर्यावरणातही उत्कृष्ट दर्जाच्या इमेज टिपणे शक्य होते, तात्पर्याने, तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेविषयी अधिक आश्वस्तता मिवणे शक्य होते.

3,295/- रूपये ते 4,975/- रूपये इतक्या रेंजमध्ये आणि 2 वर्षांच्या वॉरंटीसह उपलब्ध असलेले हे एएचडी कॅमेरा सर्वोत्तम कामगिरी आणि आयआर कॉन्स्टण्ट करण्ट डिझाईन, ईएसडी आणि सर्ज प्रोटेक्शन अशा सुरक्षा पुरवते.